# शिकवण्याची इच्छा नसलेला शिक्षक

**प्रार्थना** ''प्रिय प्रभू, देव सर्व प्रदेशातील लोकांवर, अगदी ते वाईट असले तरी, प्रीती करतो आणि म्हणूनच त्यांच्यात बदल घडवून आणण्यास मदत करण्यांसाठी तो सेवकांना पाठवतो हे मुलांना कृपा करुन समजून घेण्यास मदत कर.''

मुलांचे वय आणि गरजांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

मोठया मुलाने किंवा शिक्षकाने योना अध्याय 1, अध्याय 2 वचने 1 व 10 आणि अध्याय 3 मधून योनाचा कथा-वृत्तांत वाचून दाखवा किंवा सांगा.

देवाने योनाला वाईट-दुष्ट लोकांची मने बदलावीत, त्यांना त्यांची चूक पटावी यासाठी दुसया देशात शिक्षक म्हणून पाठवले. हे लोक शिक्षकाला आवडत नसले/तरी देवाची मात्र त्यांच्यावर प्रीती होती.

पुढील **प्रश्न** विचारा *[प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे.]*

- देवाने वादळ का पाठवले? *[पाहा योना 1:3-4]*
- वादळ शांत व्हावे यासाठी योनाने खलाश्यांना काय करण्यास सांगितले? *[योना 1:12]*



- खलाश्यांनी योनाला भर समुद्रात फेकून दिले तरी तो का बुडाला नाही? *[योना 1:17]*
- योनाचा संदेश ऐकल्यावर निनवेच्या राजाने काय केले? *[योना 3:6-8 त्याने स्वत: पश्चात्ताप केला आणि आपल्या प्रजेलाही पश्चात्ताप करण्यास सांगितले.]*

पश्चात्ताप करणे म्हणजे पातक करण्यापासून मागे फिरुन देवाच्या आज्ञा पाळणे. असे करण्यास त्याचा पवित्र आत्मा आमचे साहाय्य करतो. हे स्पष्ट करुन सांगा.

- निनवेच्या लोकांनी पश्चात्ताप केल्यावर देवाने काय केले? *[योना 3:10]*

योनाच्या कथा-वृत्तांताचे नाटयीकरण करा. मुलांनी ही छोटीशी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढ्ायांशी चर्चा करुन व्यवस्था करा. मुलांकडून नाटिकेची चांगली तयारी करुन घ्या. मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करुन घेण्यात मदत करावी.

- सर्व भूमिका करण्यास पुरेशी मुले नसतील तर ती भूमिका निवेदकाने कोणाची आहे हे सांगून वाचून दाखवावी.
- मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी **देवाची वाणी, योना** व **निवेदक** ह्या भूमिका कराव्यात.
- लहान मुलांनी **खलाशी, मोठा मासा** व **निनवेचा राजा** ह्या भूमिका करा.

**निवेदक :** योना 1 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून मग म्हणा, ''देव काय म्हणतो ते ऐका''.

**देवाची वाणी :** ''योना तू निनवे शहरात जा आणि तेथील लोकांना दुष्टपणा करण्याचे सोडून देण्यास सांगा''.

**योना :** ''मला ते लोक मुळीच आवडत नाहीत. मी काय करतो दुसया दिशेने जाणाया जहाजात जाऊन बसतो''.

**खलाशी :** तुम्ही जहाजात आहात असे समजून मागे-पुढे व्हा. आणि मोठयाने ओरडा, ''हे वादळ फारच भयंकर आहे.'' ''वाृयाने जहाज बुडत आहे!'' ''ह्या लाटा आपल्याला समुद्राच्या तळाशी नेणार!''

**योना :** झोपेतून उठल्याचा अभिनय करा. मोठयाने म्हणा, ''देव माझ्यावर रागावला आहे. मला उचलून समुद्रात फेकून द्या/म्हणजे हे वादळ शांत होईल.''

**मोठा मासा :** योनाच्या डोक्यावरुन पोहत असल्याचा अभिनय करा. म्हणा, ''हा मासा जरा विचित्रच दिसत आहे, पण काही हरकत नाही मला भूक लागली आहे त्यामुळे मी ह्याला खाऊन टाकतो.'' (त्याला गिळून टाकल्याचा अभिनय करा.)

म्हणा, ''अरे, ह्याला खाल्ल्याने माझे पोट दुखायला लागले. आता मी ह्याला ओकून टाकतो!''


**निवेदक :** वृत्तांताचा दुसरा भाग सांगा (योना 2:1-10 व अध्याय 3). मग म्हणा, ''देव काय म्हणतो ते ऐका.''

**राजा :** आपले कपडे फाडण्याचा अभिनय करा, खाली जमीनीवर बसून म्हणा, ''आम्ही पश्चात्ताप करतो, आम्ही सर्वजण पश्चात्ताप करतो!''

**देवाची वाणी :** ''तुम्ही पश्चात्ताप केलात याचा मला आनंद वाटतो. मी तुमच्यावर प्रीती करतो. तुमचा नाश करावा अशी माझी इच्छा नाही.''

**निवेदक :** किंवा मोठे मूल ' नाटिकेसाठी मदत करणाृया प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न :** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांना वर दिलेले प्रश्न मुलांनी विचारावेत.



मुलांना एका मोठया माशाचे चित्र काढायला सांगा. हे चित्र त्यांनी उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवून. आपल्याला इतर प्रदेशातील लोक आवडत नसले तरी देव त्यांच्यावर प्रेम करतो. तो आम्हांला त्यांच्याशी बोलण्यास आणि पश्चात्ताप करुन येशूवर विश्वास ठेवा असे सांगण्यास त्यांच्याकडे पाठवतो हे स्पष्ट पणे यावरुन समजते असे सांगा.

कदाचित् पश्चात्तापाविषयी काहीही सांगणारा एकही तज्ञ शिक्षक नसतांनाही वाईट-दुष्ट लोक पश्चात्ताप करुन देवाकडे वळाले असतील, आशा प्रकारची इतर **उदाहरणे** मुलांना विचारा.

**पाठ करा** यहेज्केल 14:6 'यास्तव इस्राएल घराण्यास सांग, 'प्रभू परमेश्वर म्हणतो, मागे फिरा, आपल्या मूर्तीपासून फिरा आणि आपल्या सर्व अमंगळ कर्मांपासून तोंडे फिरवा.'

**कविता** चार मुलांना योना 2:2, 3, 5 व 6 ह्यातून प्रत्येकी एक वचन म्हणण्यास सांगा.

मी आपल्या संकटावस्थेत परमेश्वराचा धावा केला, तेव्हा त्याने माझे ऐकले, अधोलोकाच्या उदरातून मी आरोळी केली तेव्हा तू माझा शब्द ऐकला.

तू मला डोहात, समुद्राच्या पोटात टाकिले, प्रवाहाने मला व्यापिले, तुझ्या सर्व लाटा व कल्लोळ मजवरुन गेले. जलांनी मला प्राण जाईपर्यन्त व्यापिले, डोहाने चोहोकडून मला घेरिले, समुद्रातील शेवाळीने माझे डोके वेष्टिले. मी खाली पर्वतांच्या तळी गेलो होता, पृथ्वीच्या अडसरांनी मला कायमचे कोंडून टाकिले होते, तरी परमेश्वरा, माझ्या देवा, तू गर्तेतून माझा जीव उद्धरिला आहे.



**Sea Weed**

मोठया मुलांनी पश्चात्ताप करुन देवाची पापक्षमा मिळवणे याविषयी कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, तू पृथ्वीवरील सर्व लोकांवर, अगदी आमचा द्वेष करणाऱ्यांवरही, प्रीती करतोस. आम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना करतो की, त्यांना येशूची सुवार्ता सांगण्यासाठी त्यांच्याकडे उपदेशक पाठवावेत. आमच्यापेक्षा वेगळया लोकांवर प्रेम करुन त्यांच्याकडे तुझा संदेश घेऊन जाण्यासाठी आमचे साहाय्य कर''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net